आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२६ मे २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेच्या सातव्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला /मागासवर्ग आणि वंचित घटकांसाठीचं आरक्षण धर्माच्या आधारे कुठल्याही समुदायाला दिलं जाणार नसल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची पुनरुक्ती
- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या, इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या ऑनलाइन जाहीर होणार
- राजकोट शहरात गेमिंग झोनला लागलेल्या आगीत मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या २७ वर /चौकशीसाठी विशेष तपास पथकाची स्थापना
- रेमल चक्रीवादळ आज मध्यरात्री बांगलादेशाच्या खेपुपारा आणि बंगालच्या उपसागरातल्या सागर बेटांदरम्यान धडकण्याची शक्यता

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या १७ व्या हंगामाच्या विजेतेपदासाठी कोलकत्ता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात लढत सुरु

**<><><><><>**

लोकसभेच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठीचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. विविध राजकीय पक्षांच्या दिग्गज नेत्यांनी आज आपापल्या पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी  सभा घेतल्या. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशात मिर्झापूर, ‘मऊ’ आणि बासगाव इथं सभा घेतल्या. कल्याणकारी हेतू आणि उद्दिष्टांमुळे देशातल्या नागरिकांनी पुन्हा एकदा भाजपाप्रणित रालोआ सरकारला निवडून देण्याचं ठरवलं असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. अनुसूचित

जाती, जमाती, इतर मागासवर्ग आणि वंचित घटकांसाठी असलेलं आरक्षण धर्माच्या आधारे कुठल्याही समुदायाला दिलं जाणार नाही, असा पुनरुच्चारही प्रधानमंत्र्यांनी केला.

केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी आज बिहारमध्ये प्रचारसभा घेतल्या. लोकसभा निवडणुकांच्या पहिल्या पाच टप्प्यातच भाजपानं ३१० जागांचा आकडा पार केला असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

भाजपाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज बिहारमध्ये जहानाबाद इथं प्रचारसभा घेतली. इंडीया आघाडीतले पक्ष भ्रष्टाचारात गुंतलेले आहेत, त्यामुळे ते कधीही जनतेच्या कल्याणाचं काम करणार नाहीत असा आरोप त्यांनी यावेळी केला. या निवडणुकीत रालोआ विजयी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यानंतर नड्डा यांनी आरा इथंही प्रचार सभेला संबोधित केलं.

मार्क्सिस्ट लेनिनिस्ट कम्युनिस्ट पक्षाचे नेते दीपांकर भट्टाचार्य यांनी काराकाट मतदारसंघात जाहीर सभा घेतली. राजदचे नेते तेजस्वी यादव बक्सर, पाटलीपुत्र, नालंदा इथं प्रचारसभांना संबोधित केलं. जनतेनं परिवर्तन घडवून आणायचा निर्धार केला आहे असं ते चंडी इथल्या प्रचारभेत म्हणाले.

समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी उत्तर प्रदेशातल्या सालेमपूर आणि बालिया इथल्या सभांना संबोधित केलं. वाढती महागाई आणि बेरोजगारी यामुळे लोक नाराज असून भाजपानं शेतकऱ्यांची फसवणूक केल्याची टीका यादव यांनी केली.

काँग्रेस प्रवक्ते पवन खेडा यांनी वाराणसी इथं प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आल्याची टीका त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

आत्ताची लोकसभा निवडणूक ही इतिहासातील अशी पहिलीच निवडणूक आहे जिथे काँग्रेसला संविधानाच्या रक्षणासाठी लढावं लागत आहे, असं काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. राहुल गांधी यांनी आज हिमाचल प्रदेशात नाहन इथं प्रचारसभेला संबोधित केलं, त्यावेळी ते बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षांत केवळ २२ जणांचं १६ लाख कोटी रुपये इतकं कर्ज माफ केलं, पण मागच्या वर्षी हिमाचल प्रदेशात अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या आपत्तीच्या काळात त्यांना केवळ ९ हजार कोटी रुपयांचं अर्थसहाय्य देता आलं नाही, अशी टीका त्यांनी केली.

या सभेनंतर राहुल गांधी यांनी आज हिमाचल प्रदेशातच उना इथं प्रचारसभा घेतली. भाजपानं दोन कोटी रोजगाराचं दिलेलं आश्वासन पाळलं नाही, अग्निवीर योजना आणून त्यांनी लाखो युवकांचं भविष्य अंधारात लोटलं अशी टीका त्यांनी केली.  काँग्रेस सत्तेत आल्यास गरीब महिलांना वर्षाला १ लाख रुपये देण्याच्या योजनेसह, काँग्रेसच्या जाहीरनाम्यात दिलेल्या वचनांच्या लाभाबद्दल त्यांनी उपस्थितांना सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळानं घेतलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर होणार आहे. मंडळाच्या विविध संकेतस्थळांवर निकाल बघता येईल. गुणपडताळणीसह गुणपत्रिका छायाप्रतींसाठी २८ मे पासून ११ जूनपर्यंत संकेतस्थळावरच ऑनलाइन पद्धतीनं अर्ज सादर करता येईल.

**<><><><><>**

गुजरातच्या राजकोट शहरात गेमिंग झोनला काल संध्याकाळी लागलेल्या आगीत मृत्यूमुखी पडलेल्यांचा आकडा २७ वर पोहोचला आहे. यात ९ लहान मुलांचाही समावेश आहे. या दुर्घटनेच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी या घटनेतल्या मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये नुकसानभरपाई देण्याची घोषणा केली.

वेल्डिंगच्या कामात झालेल्या चुकीमुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती आहे. गुजरात उच्च न्यायालयानं या घटनेची स्वतःहून दखल घेतली आहे. याची सुनावणी उद्या होणार आहे.

दिल्लीतल्या विवेक विहार परिसरातल्या बालरुग्णालयाला काल रात्री लागलेल्या आगीत ६ नवजात अर्भकांचा मृत्यू झाला, तर १२ बालकांची सुटका करण्यात यश आलं. यापैकी एक बाळ अतिदक्षता विभागात आहे आणि इतर पाच बालकांवर इतर रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

या दुर्घटनेबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. गुजरात आणि दिल्ली इथल्या आग दुर्घटनांमधल्या मृतांच्या नातेवाईकांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये देण्याची घोषणा पंतप्रधान कार्यालयानं समाजमाध्यमावर केली आहे.

**<><><><><>**

रेमल चक्रीवादळ आज मध्यरात्री बांगलादेशाच्या खेपुपारा आणि बंगालच्या उपसागरातल्या सागर बेटांदरम्यान धडकण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर

पश्चिम बंगाल प्रशासनानं मदत आणि पुनर्वसनाच्या उपाययोजना केल्या असून, प्रत्येक जिल्ह्यात एक विशेष नियंत्रण कक्ष तर, कोलकाता पोलीस मुख्यालयात एकात्मिक नियंत्रण कक्ष सुरू केला आहे.

पोलिस यंत्रणा, अग्निशमन विभाग, महापालिका, बांधकाम विभाग, कोलकत्ता महानगर विकास प्राधिकरण, आपत्ती व्यवस्थापन विभाग, वीज पुरवठा यंत्रणा आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल अशा सर्व महत्वाच्या यंत्रणांना सज्जेतेचे आदेश दिले गेले आहेत.

**<><><><><>**

पापुआ न्यू गिनी इथं झालेल्या भूस्खलनात सुमारे ६७० जण गाडले गेले असल्याचा अंदाज संयुक्त राष्ट्रसंघाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. एंगा प्रांतातील काओकलाम या दुर्गम गावात, शुक्रवारी पहाटे तीन वाजता हे भूस्खलन झालं होतं. यात अंदाजे दीडशेहून जास्त घरं गाडली गेली अशी माहिती पापुआ न्यू गिनीत, कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय स्थलांतर संस्थेचे प्रमुख सेरहान अक्तोप्राक यांनी दिली. इथली जमीन अजूनही घसरत असल्यानं बचावपथकंही धोक्याच्या परिस्थितीत काम करत असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारताच्या दोन चित्रकर्मींनी यंदा प्रतिष्ठेच्या कान चित्रपट महोत्सवात मानाच्या पुरस्कारांना गवसणी घातली. यामुळे यंदाचा कान महोत्सव भारतीय चित्रपटांसाठी अविस्मरणीय ठरला आहे. या यशाबद्दल माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं प्रसिद्धीला दिलेल्या निवेदनाद्वारे विजेत्यांचं कौतुक केलं आहे. गेल्या ३ दशकांमध्ये पहिल्यांदाच पायल कपाडिया यांनी दिग्दर्शित केलेल्या ‘ऑल वी इमॅजिन ॲज लाइट’ या चित्रपटाने ग्रँड पिक्स पुरस्काराला गवसणी घातली.

पुण्याच्या एफटीआयआय अर्थात चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या माजी विद्यार्थिनी असलेल्या पायल कपाडिया हा बहुमान मिळवणाऱ्या पहिल्यावहिल्या भारतीय आहेत.

याशिवाय एफटीआयआयचेच विद्यार्थी दिग्दर्शक चिदानंद नाईक यांच्या ‘सनफ्लावर्स वेअर द फर्स्ट वन्स टू नो’ या लघुपटाला सर्वोत्कृष्ट लघुपटासाठीच्या ला सिनेफ पुरस्कारानं गौरवण्यात आलं. तसंच प्रसिद्ध भारतीय सिनेमॅटोग्राफर संतोष सिवन यांना यंदाच्या कान चित्रपट महोत्सवात प्रतिष्ठेचा पिएर अँजेन्यू ट्रिब्यूट पुरस्कार मिळाला. ‘द शेमलेस’ या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार पटकावणाऱ्या अनसूया सेनगुप्ता या पहिल्या भारतीय व्यक्ती ठरल्या. एफटीआयआयचे माजी विद्यार्थी असलेले चित्रकर्मी मैसम अली यांचा ‘द रिट्रीट’ हा चित्रपट या महोत्सवात दाखवण्यात आला. या सर्वांचा गौरवपूर्ण उल्लेख माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं आपल्या निवेदनात केला आहे.

**<><><><><>**

कान चित्रपट महोत्सवात पुरस्कार मिळालेल्या चित्रपट दिग्दर्शिका पायल कपाडिया यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज समाजमाध्यमाद्वारे अभिनंदन केलं आहे. पायल यांची प्रतिभा जागतिक स्तरावर चमकत असून यातून भारताच्या सर्जनशीलतेचं दर्शन होत आहे. हा पुरस्कार केवळ पायल यांचा सन्मान नाही, तर यामुळे भारताच्या नव्या पिढीच्या चित्रपटकर्मींना प्रेरणा मिळेल, असं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज वडाळा इथं जे. के. केमिकल नाला, चुनाभट्टी इथला ए. टी. आय. नाला, बीकेसी इथं मीठी नदी, जोगेश्वरीचा मजास

नाला आणि दहिसर नदी याठिकाणी नालेसफाईच्या कामाची पाहणी केली. दरड प्रवण क्षेत्रांमध्ये संरक्षण जाळ्या लावण्यासोबतच या भागातल्या नागरिकांच्या निवासाची पर्यायी व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्याचं मुख्यमंत्र्यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं.

नाला रुंदीकरणाचं काम अनेक ठिकाणी सुरू आहे. स्थानिकांनी पालिकेच्या कामाला सहकार्य करावं. नाला रुंदीकरणात अडथळा ठरणारी बांधकाम हटवण्याला विरोध करू नये, अशा प्रकल्पांमुळे बाधित झालेल्यांना मोबदला देण्याची किंवा पर्यायी निवासाची व्यवस्था करण्यात येईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या १७ व्या हंगामाच्या विजेतेपदासाठी आज चेन्नईतल्या एम.ए. चिदंबरम स्टेडिअमवर कोलकत्ता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सामना सुरू आहे. सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा सनरायझर्स हैदराबादच्या ७ षटकात ४ बाद ४७ धावा झाल्या होत्या.